# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### माणगाव तालुक्यामध्ये (जि.रायगड) एमआयडीसी अंतर्गत स्थापित झालेल्या कंपनीमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकरी न दिल्याबाबत

**(१) ७६३१ (१०-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने सन १९८८ साली विळे भागाड (ता. माणगाव जि. रायगड) परिसरात जमीन संपादीत करुन विविध कंपन्या संपादित जागेत सुरु झाल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील संपादित केलेल्या जमीनमालकांना अर्थात प्रकल्पग्रस्तांना कार्यान्वित कंपन्यांमध्ये नोकरी देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना कंपनी प्रशासनामध्ये प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कंपनीमध्ये सामावून घेण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप करताना उद्योजकासमवेत करारनामा करण्यात येतो व करारनाम्यात प्रकल्पग्रस्ताना नोकरीत सामावून घेण्याची अट नमूद करण्यात येते. त्यानुसार विळे भागाड औद्योगिक क्षेत्रात एकूण १० कंपन्या सुरु असून त्यामध्ये ६० प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कंपनीमध्ये सामावून घेण्यात आले आहे.

---

### राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृह उभारण्याबाबत

**(२) २१९२८ (०९-०७-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेता यावे म्हणून राज्य सरकार प्रत्येक तालुक्यामध्ये वसतिगृह उभारणार असल्याचे मा.सामाजिक न्याय मंत्री श्री.राजकुमार बडोले यांनी पुणे येथे दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतिगृहाचे स्वरुप काय असणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृह उभारण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१), (२) व (३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मागासवर्गीय मुलींसाठी तालुका स्तरावर ४३ व विभागीय स्तरावर ७ अशी एकूण ५० नवीन वसतीगृहे शासन निर्णय दि.१६ डिसेंबर,२०१५ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषी प्रक्रिया संस्थाच्या बळकटीकरणाबाबत**

**(३) ३३४०७ (१५-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी प्रक्रिया संस्थांची अवस्था बिकट झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कापुस पिंजणी व गासडी बांधणाऱ्या ६० टक्के संस्था तोटयात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कृषी प्रक्रिया संस्थाच्या बळकटीकरणासाठी कोणती कार्यवाही आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) राज्यातील कृषि प्रक्रिया संस्थांच्या बळकटीकरणासाठी पणन संचालक, पुणे व सहसंचालक (प्रक्रिया), पणन संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दोन वेगवेगळ्या समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या दोन्ही समित्यांचे अहवाल शासनास प्राप्त झाले असून सदर अहवाल विचारात घेऊन कृषि प्रक्रिया संस्थांच्या बळकटीकरणासाठी व शासनाचे कर्ज वसुल होण्याच्या दृष्टीने सध्याच्या धोरणात बदल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, सध्या अर्थसहाय्य दिलेल्या काही संस्थांकडून त्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी या संस्थांना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम १५५ नुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे स्तरावरुन नोटीसा बजावण्यात आलेल्या असून वसुलीसाठी सक्तीने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कारेगांव (ता.जि.परभणी) येथील माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांना कमी केल्याबाबत**

**(४) ४३९९५ (३०-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंत अनु.जाती माध्यमिक आश्रमशाळा कारेगांव (ता.जि.परभणी) येथे सह-शिक्षक श्री राम गारकर यांचे सह चार शिक्षक नियमात बसत नसल्याने त्यांना प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद यांनी अपात्र ठरवून कमी केले असतांनाही सदरहू शिक्षकांना जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. परभणी यांनी नियमबाहय पध्दतीने पुन्हा सेवेत घेऊन कायम करण्याचा तसेच मागील फरकासह वेतन अदा करण्याबाबतचा आदेश काढल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शिक्षकांना पुन्हा सेवेत घेण्याचे अधिकार नसतांना व संस्थेची संमती नसताना सुध्दा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. परभणी यांनी नियमबाहय पध्दतीने पुन्हा सेवेत घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन कमी केलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा नियमबाहय पध्दतीने सेवेत घेऊन त्यांचे वेतनावर झालेला खर्च संबंधित दोषी अधिकारी श्री. सोनावणे व श्री.माळवदकर यांच्याकडून वसुल करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१२-२०१८) :** (१) होय.
संबधित शिक्षक हे विषयनिहाय नसल्याने जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांनी या कर्मचाऱ्यांना वैयक्तीक मान्यता नाकारली होती,तथापि तद्नंतर या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांचे सदर आश्रमशाळेत समायोजन करण्यात आलेले आहे.
(२) नाही.
अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौंड तालुक्यातील (जि.पुणे) येथील मुलींच्या वसतीगृहाच्या इमारतीबाबत

**(५) ६०५२३ (३०-११-०००२). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) मुलींचे वसतीगृह खाजगी जागेत असुन मुलींची गैरसोय होत असल्याने स्थानिक लोक्रतीनिधिनी दौंड तालुक्यात मुलींचे वसतीगृहासाठी इमारत बांधणेबाबत मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने दौंड तालुक्यात मुलींच्या वसतीगृहासाठी इमारत बांधणेबाबत काय कार्यवाही केली आहे वा करत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-११-०००२) :** (१) होय.

(२) मुलींच्या शासकीय वसतीगृहकरीता दौंड करीता लिंगाळी येथे सरकारी जागा उपलब्ध असून, या जागेसाठी ग्रामपंचायतीकडे जागेची मागणी करण्यात आलेली असून, ग्रामपंचायतीने अदयाप यासाठी मंजूरी ठराव दिलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेगाव (ता.जत, जि.सांगली) येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेले वसतिगृह स्थलांतरित झाल्याबाबत

**(६) ६१५३९ (३०-७-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव, (ता. जत, जि. सांगली) या गावातील मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी सुरु असलेले विद्यार्थी वसतिगृह माहे मे,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान अचानकपणे स्थलांतरित केल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहाचे स्थलांतर करत असताना शासनाची पूर्व परवानगी घेणे गरजेचे असताना केवळ जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्याची परवानगी घेऊन स्थलांतर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहाच्या स्थलांतराचे नेमके काय कारण आहे,

(४) असल्यास, सदर वसतिगृह स्थलांतरण प्रक्रियेची चौकशी केली काय,
(५) असल्यास, चौकशी मध्ये दोषी आढळणारे अधिकारी व संस्थापकावर काय कारवाई केली तसेच वसतिगृहाची मान्यता रद्द करणार आहे काय,
(६) तसेच, गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण घेणासाठी येणाऱ्या बाहेरगावातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गैरसोय व मुलांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये म्हणून काय उपाययोजना करणार आहात, नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) नाही.

अनुदानित वसतीगृहासाठी निर्धारीत टक्केवारीप्रमाणे विदयार्थी मिळत नसल्याने शेगांव (ता.जत, जि.सांगली) येथील मागासवर्गीय विदयार्थ्यासाठीचे वसतीगृह मौजे राजेवाडी (ता.आटपाडी, जि. सांगली) येथे स्थलांतरीत करण्याच्या संस्थेने केलेल्या विनंतीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी या स्थलांतरणास मान्यता दिलेली आहे.
(२) जिल्हांतर्गत वसतीगृह स्थलांतरणाचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असल्याने या स्थलांतरणास शासनाच्या परवानगीची आवश्यकता नव्हती.
(३) शेगांव ता.जत जि.सांगली येथे निर्धारीत टक्केवारीप्रमाणे विदयार्थी मिळत नसल्याने सदर वसतीगृह मौजे राजेवाडी ता.आटपाडी जि.सांगली येथे स्थलांतरीत करण्याची विनंती संस्थेने केली होती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि या हस्तांतरणाबाबत घेण्यात आलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सांगली यांनी दि.२१.६.२०१६ अन्वये सदर वसतीगृहाचे स्थलांतरण रद्द केलेले असून, प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(६) या वसतीगृहाच्या स्थलांतरणाचे आदेश रद्द करण्यात आले असल्याने सदर वसतीगृह पूर्वीच्या ठिकाणी चालू आहे. त्यामुळे अन्य उपाय योजनेची आवश्यकता नाही.

---

## राज्य शासनाने आदिवासी प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला निर्णय

**(७) ६६५५१ (०७-०२-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने आदिवासी प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कायद्याची अंमलबजावणी करताना आतापर्यंत आदिवासींच्या जागेवर किती बिगर आदिवासींची पदे भरल्याचे निदर्शनास आले आहे व सदर ठिकाणी आदिवासींची पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-१२-२०१८) :** (१) आदिवासी प्रतिबंधक असा कायदा नाही.

(२) अनुसूचीत जमातीच्या संवर्गासाठी राखीव पदावर बिगर आदिवासी उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**कोल्हापूर येथील शेतक-यांनी उत्पादन खर्चावर आधारित किमान दर गुळाला देण्याची मागणी बाजार समितीकडे केल्याबाबत**

**(८) ७१६९४ (२७-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्पादन खर्चावर आधारित किमान दर गुळाला ठरविण्यात यावा, अशी मागणी कोल्हापूर येथील शेतक-यांनी बाजार समितीच्या माहे ऑक्टोबर, २०१६ च्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोण्ता निर्णय घेतला, त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) होय.

(२) बाजार समितीत विक्रीसाठी आलेल्या गुळाची किंमत जाहीर लिलावाद्वारे निर्धारित होते. शेतमालाला हमीभाव केंद्र शासनामार्फत जाहीर होतात. तथापि, गुळ हा नाशवंत असल्याने किमान हमी भाव देता येत नाही.

(३) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**बुलडाणा येथील सामाजिक न्याय विभागांतर्गत प्रलंबीत असलेल्या प्रश्नाबाबत**

**(९) ८०१८९ (२१-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा येथील सामाजिक न्याय विभागांतर्गत प्रलंबीत असलेल्या विविध प्रश्नांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ ऑक्टोंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा.सचिव सामाजिक न्याय विभाग यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) होय.

(२) मा.लोकप्रतिनीधी यांनी मोताळा, जि.बुलढाणा येथे वसतीगृह सुरु करण्याची तसेच बुलढाणा येथील शासकीय वसतीगृहाची प्रवेश क्षमता वाढविण्याची मागणी सदर निवेदनाव्दारे केलेली आहे.

शासन निर्णय दि.१६ डिसेंबर, २०१५ अन्वये मोताळा, मलकापूर व बुलढाणा जि.बुलढाणा येथे १०० क्षमतेची मुलींचे वसतीगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली असून, दि.८ मार्च,२०१६ रोजी ही वसतीगृह सुरु करण्यात आलेली आहेत.

बुलढाणा येथील वसतीगृहाची क्षमता वाढविण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक कर्जाच्या व्याज परताव्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१०) ८६८५१ (०९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी पीक कर्जापोटी घेतलेल्या रक्कमेवर केंद्र व राज्य शासनाकडून व्याज सवलत दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका व्याज परतावा रक्कमेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास असमर्थता दाखवित असल्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावांतील शेतकरी या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्जापोटी घेतलेल्या रक्कमेवर व्याज सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) ज्या राष्ट्रीयकृत बँकांनी व्याज परतावा रकमेचे प्रस्ताव सहकार विभागास पाठविले नाहीत असे प्रस्ताव त्वरीत सहकार आयुक्त कार्यालयास पाठवणेबाबत जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना निर्देश देण्यासंबंधी जिल्हा उपनिबंधक उस्मानाबाद यांना दि. २०.११.२०१७ रोजीच्या शासन पत्राने कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**परराज्यातील आंब्यांची आवक वाढल्याने कोकणातील आंबे उत्पादकांचे झालेले आर्थिक नुकसान**

**(११) ८९१४६ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश केरळ, दिल्ली इ. भागातील आंबा माहे एप्रिल व मे, २०१७ मध्ये बाजारपेठेत येण्याऐवजी माहे फेब्रुवारी, २०१७ महिन्यातच मुंबई कृषी उत्पन्न बाजारपेठेत आल्याने कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे, माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषतः केरळ, कर्नाटकातील आंबा, कोकण देवगड येथील सुप्रसिद्ध हापूस आंब्याच्या नावाने बाजारात विक्री करुन लाखो ग्राहकांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील आंबा उत्पादक शेतक-यांना परराज्यातून येणा-या आंब्यामुळे नुकसान होऊ नये याकरीता राज्य शासन व पणन विभागाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) माहे फेब्रुवारी व मार्च २०१७ या कालावधीत कर्नाटक, केरळ राज्यातून हापूस आंबा मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवारात आला. त्याचप्रमाणे कोकणातूनही मोठ्या प्रमाणात हापूस आंब्याची आवक झाली. त्यामुळे सदर वर्षात हापूस आंब्याचे बाजार भाव कमी झाल्याचे दिसून आले.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानीत आश्रम शाळांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(१२) ९१५०१ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानीत आश्रम शाळांना देण्यात येणा-या परिपोषण अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) होय.
(२) या संदर्भात मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या चार बैठका घेण्यात आलेल्या असून, दि. ०१ जून २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनुदानित वसतीगृहांसाठी सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे डाळी व धान्य पुरविणे शक्य असल्याचा मुद्दा उपस्थिती झालेला आहे.

त्यानुषंगाने या संस्था तसेच संस्थेतील प्रवेशितांची माहिती मागविण्यात आलेली असून, सदर माहिती प्राप्त होताच समितीची बैठक घेण्यात येऊन परिपोषण अनुदान वाढविण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येईल व समितीच्या शिफारशीनुसार शासन त्यावर निर्णय घेईल.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

**तारापूर एमआयडीसी (जि.पालघर) क्षेत्रात संप १, २, ३, ४ मधील गाळ (घनकचरा) काढण्यात आला नसल्याबाबत**

**(१३) ९३०६९ (१८-०८-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर एमआयडीसी (जि.पालघर) क्षेत्रात संप १, २, ३, ४ मधील गाळ (घनकचरा) काढण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता प्राप्त झालेला निधी कसा व कुठे खर्च करण्यात आला याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०५-१२-२०१८) :** (१) दिनांक १८/०४/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी महामंडळाच्या संबंधित कार्यालयातील अधिकारी यांच्यासोबत केलेल्या पाहणी दरम्यान सदर बाब निदर्शनास आली होती, हे खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक महामंडळास शासनाकडून निधी प्राप्त होत नाही.

१) तारापूर औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी साठवण टाकी क्रमांक १ मधील गाळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने माहे मे, २०१७ मध्ये स्वखर्चाने काढून शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा प्रक्रिया केंद्राकडे पाठविलेला आहे.

२) साठवण टाकी क्रमांक २ मधील गाळ पावसाळयानंतर काढण्याचे प्रस्तावित होते परंतु कामासाठी अंदाजित खर्च रुपये ६.२४ कोटी इतका असल्यामुळे त्यास प्रशासकीय मंजुरीची आवश्यकता निर्माण झाली. सदर प्रक्रिया अपेक्षित वेळेत पूर्ण न होऊ शकल्यामुळे गाळ काढण्याचे काम अद्यापी पूर्ण होऊ शकले नाही.

३) साठवण टाकी क्रमांक ३ व ४ मधील गाळ मे. TEPS यांनी माहे एप्रिल व मे २०१७ मध्ये स्वखर्चाने काढला.

४) साठवण टाकी क्रमांक ३ मधील मे. TEPS यांनी काढलेला गाळ शास्त्रोक्त पदध्तीने विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रक्रीया केंद्राकडे महामंडळाने स्वखर्चाने पाठविलेला आहे.

५) साठवण टाकी क्रमांक ४ मधील मे. TEPS यांनी काढलेला गाळ मे. TEPS यांनी स्वखर्चाने शास्त्रोक्त पदध्तीने विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रक्रीया केंद्राकडे पाठविलेला आहे.

---

**महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थानाच्या नुतनीकरणाबाबत**

**(१४) ९५८६४ (१०-०१-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लंडन येथील वास्तव्य करित असलेल्या घराचे स्मारकात रुपांतर करण्याचा निर्णय सुमारे २ ते ३ वर्षापूर्वी शासनाने घेवूनही स्मारकाचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-११-२०१८) :** (१) व (२) सदर घराच्या स्मारकाचे नूतनीकरणासाठी विभागाच्या दि.३१/१/२०१७ व दि.१५/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रक्कम अदा करण्यात आली असून सध्या काम प्रगतीपथावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत असणाऱ्या बारवी धरण प्रकल्पग्रस्तांबाबत**

**(१५) ९६०५९ (१३-०७-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (जि.ठाणे) यांच्या अखत्यारीत असणाऱ्या बारवी धरण प्रकल्पग्रस्तांच्या मुल्यांकन पॅकेज वाटपात तसेच विकास कामामध्ये स्थलांतरीत केलेल्या प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या खावटीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या गैरव्यवहारासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तदनुसार प्रकल्पग्रस्त पॅकेज, विकासकामे, मुल्यांकन व खावटीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०५-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि अशा प्रकारची तक्रार लोकप्रतिनिधीनी दिनांक १४/०६/२०१७ रोजी महामंडळाकडे केली आहे.

(२) महामंडळाच्या विनंतीनुसार विभागीय आयुक्त कोकण यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना निर्देश दिल्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उप विभागीय अधिकारी, कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती स्थापन करुन दि. २६/०४/२०१८ रोजी फेरमुल्याकंन करण्याचे आदेश दिले. फेर मुल्यांकनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) शिखर समितीमार्फत बारवी प्रकल्पबाधितांच्या घरांच्या फेरमूल्यांकनाची कार्यवाही दि. १८/०५/२०१८ पासून कोळेवडखळ गावात सुरु करण्यात आली होती. परंतु बारवी प्रकल्पपिडीत सेवा मुरबाड व ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे फेरमूल्यांकन शक्य झालेले नाही.

---

**चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतंर्गत आदिवासीकडून फॉर्मकरिता जादा शुल्क आकारणी केल्याबाबत**

**(१६) ९७२४२ (०६-०१-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत एजंटानी आदिवासींकडून एका फॉर्मची किंमत ५० ते ७० रुपये घेऊन लुटले असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदार कार्यालयाकडून कोणताही एजंट वा अधिकारी पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांची कर्जमाफीच्या नावावर लूट करणाऱ्या एजंटला पकडण्यात आले आहे काय तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१८) :** (१) नाही,

सदर प्रकरणी सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, चिखलदरा तसेच तहसिलदार, चिखलदरा यांचेकडे याबाबतची कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

(२) होय.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रांजणगावदेवी सौदाळा येथील पाणी उपसा जलसिंचन योनजेचे थकीत कर्ज माफ करण्याबाबत**

**(१७) ९७२७५ (०२-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रांजणगावदेवी सौदाळा येथील पाणी उपसा जलसिंचन योनजेच्या (लिप-ट) थकीत कर्जाला माफी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार सदर थकीत कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) नाही.
(२) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रांजणगावदेवी सौंदाळा येथे अंबिका सहकारी पाणीपुरवठा संस्था व जगदंबा सहकारी पाणीपुरवठा संस्था, रांजणगाव या दोन संस्थाना राज्यशासनाच्या सन २००९ मधील कर्जमाफी योजनेंतर्गत अनुक्रमे रु. १४.८२ लाख व १५.०७ इतक्या रकमेची कर्जमाफी मिळालेली होती. सद्य:स्थितीत या दोन्ही संस्थांची नोंदणी दिनांक ३०.०३.२०१३ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासे (जि.अहमदनगर) शहरासह तालुक्यात खाजगी सावकारीत गत वर्षापासून परप्रांतीयही सक्रिय असल्याबाबत**

**(१८) ९७६७८ (०६-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासे (जि.अहमदनगर) शहरासह तालुक्यात नोंदणी नसलेल्या खाजगी सावकरीत गत वर्षापासून परप्रांतीयही सक्रिय असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने या परिसरात शोध मोहिम हाती घेतली आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती खाजगी सावकारांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नेवासा तालुक्यात सन २०१७ मध्ये अवैध सावकारीबाबतचे एकूण ११ तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी चौकशी केली असता, सदर तक्रारींमध्ये काही तथ्य न आढळल्याने ते सर्व तक्रार अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात पीक कर्जमाफीचे अर्ज भरतांना विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे अर्ज भरण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याबाबत**

**(१९) ९८२७७ (१०-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात पीक कर्जमाफीचे अर्ज भरण्यासाठी दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ ची शेवटची तारीख असतांना वादळी वाऱ्यामुळे अनेक गावांमध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे अर्ज भरण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१८) :** (१) नाही.
दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने शेतकऱ्यांना अर्ज भरण्यास अडचणी निर्माण झाल्या, याबाबतची कोणत्याही शेतकऱ्यांची तक्रार जिल्हा उपनिबंधक कार्यालय, बुलढाणा यांना प्राप्त नाही.
(२) शासनाने दिनांक १५ सप्टेंबर २०१७ पर्यंत कोणत्याही कारणास्तव कर्जमाफीचे ऑनलाईन अर्ज न करू शकलेल्या शेतकऱ्यांसाठी दि. २२ सप्टेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती येथील नवसारीस्थित आदिवासी महर्षी पब्लिक स्कूलमध्ये संचालकांच्या हलगर्जीपणामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू**

**(२०) ९९४६९ (२९-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील नवसारीस्थित आदिवासी महर्षी पब्लिक स्कूलमध्ये संचालकांच्या हलगर्जीपणामुळे एका आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या महर्षी पब्लीक स्कूल, नवासारी, अमरावती या शाळेतील इयत्ता २ री मधील विद्यार्थी रोशन सावरकर याचा दिनांक २.१०.२०१७ रोजी मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर आपत्कालीन आढावा गट तयार करुन या प्रकरणाबाबतची चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये विद्यार्थ्यास जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यास शाळा व्यवस्थापनाने दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्याने रोशन सावरकर या विद्यार्थ्याच्या पालकास शाळेमार्फत रुपये ७५,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. तसेच शाळेमार्फत विद्यार्थ्याच्या आरोग्यासाठी डॉक्टर व नर्सची व्यवस्था केलेली आहे. तसेच विद्यार्थ्याची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

---

**नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडील ५४ वसतिगृहास मान्यता नसतांना देयक काढल्याबाबत**

**(२१) १००१३९ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडील ५४ वसतिगृहास मान्यता नसतांना देयके काढल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) राज्यातील मुळ मान्सता आदेश नसलेल्या अनुदानित वसतीगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, त्यानुषंगाने राज्यामंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अशा वसतीगृहांच्या सुनावण्या घेतलेल्या आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हयातील ५४ वसतीगृहे सुनावणीमध्ये पात्र आढळून आल्याने त्यांचे अनुदानाचे आदेश आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे स्तरावरु देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**सीकेपी बँक, लोकपूरक (जि.ठाणे) या शाखेतील संगणकामध्ये फेरफार करून ग्राहकांच्या मुदत ठेवीची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळविल्याबाबत**

**(२२) १०१३२६ (१३-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीकेपी बँक, लोकपूरक (जि.ठाणे) या शाखेतील संगणकामध्ये फेरफार करून ग्राहकांच्या मुदत ठेवीची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळविल्याची धक्कादायक बाब दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी ७ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून या प्रकरणी पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) तसेच खातेदारांचे पैसे परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) सीकेपी बँकेच्या लोकपुरम शाखेतील अधिकारी, कर्मचारी व कर्जदार यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे सन २०१३ मध्ये निदर्शनास आल्यानंतर बँकेच्या तत्कालीन संचालकांनी शाखा व्यवस्थापक अंजली पिसाळ व चंद्रशेखर कर्वे, शाखाधिकारी उन्नती ठोंबरे, लिपिक सतीश जांभळे, शिपाई विकास कुबल व नरेंद्र जाधव यांचेविरुद्ध दिनांक २५.११.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला. त्यानुसार आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, ठाणे यांनी विकास कुबल, नरेंद्र जाधव व कर्जदार सत्येन सावला यांना दिनांक ९.११.२०१७ रोजी अटक केली असून संबंधीतांची चौकशी सुरु आहे. उर्वरीत तीन कर्मचाऱ्यांना बँकेने जून २०१८ मध्ये सेवेतून बडतर्फ केले आहे.

सप्टेंबर, २०१८ अखेर बँकेने १२ ठेवीदारांना रु. २.९२ कोटींच्या ठेवींचे वाटप केले आहे.

(४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**साखर कारखान्यांचे ऑन लाईनद्वारे गाळप परवाना अर्ज साखर आयुक्तालयाने मागविल्याबाबत**

**(२३) १०१३९३ (१३-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू वर्षी ऊस गाळप हंगाम सन २०१७-१८ चे साखर कारखान्याचे ऑन लाईनद्वारे गाळप परवाना अर्ज माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान साखर आयुक्तालयाने मागविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत किती अर्ज प्राप्त झाले आहे, त्यानुषंगाने किती कारखान्यांना परवानगी देण्यात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) होय.
(२) ऊस गाळप हंगाम सन २०१७-१८ पासून विकसीत करण्यात आलेल्या गाळप परवाना सॉफ्टवेअरमध्ये राज्यातील १९५ साखर कारखान्यांनी गाळप परवानगी मागणी अर्ज सादर केले होते. त्यापैकी १८५ साखर कारखान्यांना गाळप परवाना अदा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**सहकार आयुक्त कार्यालयाचे अप्पर निबंधक यांनी कोल्हापूर जिल्हयातील विविध विकास संस्थाना भेटी देऊन कर्जमाफीचा आढावा घेतल्याबाबत**

**(२४) १०१३९५ (१३-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकार आयुक्त कार्यालयाचे अप्पर निबंधक यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूर जिल्हयातील विविध विकास संस्थाना भेटी देऊन कर्जमाफीचा आढावा घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आढाव्यात कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,
(३) असल्यास, या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१८) :** (१) व (२) अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना -२०१७ या योजनेची अंमलबजावणी, बँकेचे Data Uplaoding चे कामकाज व लेखापरीक्षणाचे कामकाज यामध्ये योग्य तो समन्वय राखला जावा व योजनेचे कामकाज शिघ्र गतीने व्हावे, तसेच योजनेच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन करणे या उद्देशाने कोल्हापूर जिल्ह्यास भेट दिली व योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

सदर आढावा भेटीत त्रुटी आढळून आलेल्या नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**राज्य शासनाने जाहिर केलेल्या कर्जमाफीतील बदलत्या निकषामुळे कोल्हापूर जिल्हयातील सुमारे १ लाख ७५ हजार शेतकरी या योजनेपासून वंचित राहत असल्याबाबत**

**(२५) १०१३९६ (१३-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जाहिर केलेल्या कर्जमाफीतील दररोज बदलत्या निकषामुळे हंगाम निकष डावलून आर्थिक वर्ष धरल्यास कोल्हापूर जिल्हयातील सुमारे १ लाख ७५ हजार शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, कर्जमाफीच्या निकषांत शेतकऱ्यांच्या दृष्टीने योग्य ते बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) नाही.

नाबार्डच्या धोरणानुसार कर्जवाटपाचा कालावधी खरीप हंगामातील १ एप्रिल पासुन सुरू होत असून तो रब्बी हंगामातील ३१ मार्च अखेर पर्यंत धरला जातो. शासनाने थकीत कर्जाच्या माफीसाठी दि. ३१.०३.२०१६ अखेर पर्यंतच्या थकीत कर्जाचा समावेश केला आहे. तसेच प्रोत्साहनपर रकमेसाठी सन २०१५-१६ चा खरीप व रब्बी हंगाम विचारात घेण्यात आला आहे. तसेच शासनाचे आर्थिक वर्ष दि. १ एप्रिल ते ३१ मार्च असल्याने हंगाम निकष व आर्थिक निकष एकच आहे, यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासुन वंचित राहत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कायम विना अनुदानीत तत्वावर मान्यता दिलेल्या व अनुदान देण्यासाठी तपासणी करुन निकष पात्र ठरलेल्या अनुसूचीत जातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना राज्याचे अनुदान देण्याबाबत**

**(२६) १०१९३२ (०६-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कायम विना अनुदानीत तत्वावर मान्यता दिलेल्या व अनुदान देण्यासाठी तपासणी करुन निकष पात्र ठरलेल्या अनुसूचीत जातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना राज्याचे अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावास जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात येत असल्याची बाब दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळाचं मुल्यांकनाप्रमाणे पात्र असलेल्या अनुसूचीत जातीच्या आश्रमशाळांना अनुदान देण्यासंबधी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) नाही.
(२) अनुदान देण्यासाठी तपासणी करून निकष पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना राज्याचे अनुदान देण्याकरीता राज्याची स्वतंत्र योजना करुन या शाळांना अनुदान देण्याचा प्रस्ताव मंत्रीमडळासमोर सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दलित, ओबीसी विद्यार्थांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नसल्याबाबत**

**(२७) १०२६३८ (१३-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दलित, आदिवासी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्गीय (ओबीसी) या विद्यार्थ्यांना शासनाच्यावतीने शिष्यवृत्ती दिली जात असून, सदरहू शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यालाच मिळावी यासाठी ही रक्कम थेट विद्यार्थ्याच्या खात्यात जमा करण्याचे शासनाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सुरु होऊन ५ महिन्याच्या कालावधीनंतरही विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या दलित, आदिवासी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्गीय (ओबीसी) या विद्यार्थ्यांना अद्याप शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसल्यामुळे गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-११-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१७-१८ मध्ये महाडिबीटी पोर्टल पुर्णपणे कार्यान्वित होवू न शकल्याने पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन स्विकारुन त्यांचे शैक्षणिक लाभ त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर अदा करण्याचा निर्णय दिनांक २९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. तद्नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिका क्र.४०८/२०१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये, ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना संबंधित विभागांकडील मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) आणि आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अद्याप प्राप्त होवू शकलेली नाही, अशा महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी आज (दिनांक १८.५.२०१८) अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळुन, उर्वरीत विद्यार्थ्यांची अनुज्ञेय/पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थेला ऑफलाईन पध्दतीने अदा करण्याचा निर्णय दिनांक १७.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी सर्व संबंधित विभागांकडून करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अडकून पडलेला निधी मिळावा यासाठी बँकेसमोर केलेले ठिय्या आंदोलन**

**(२८) १०३२६३ (१३-०७-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अडकून पडलेला निधी मिळावा यासाठी शेतकरी, शिक्षक तसेच जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांसह पदाधिकारी, सदस्य व ठेकेदारांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास बँकेसमोर ठिय्या आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर बँकेतील ठेवीदारांचा अडकून पडलेला निधी त्यांना परत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) होय.

(२) शासनामार्फत नोव्हेंबर २०१७ पासुन कर्जापोटी रक्कम टप्प्याटप्प्याने बँकेस प्राप्त होत असल्याने बँकेने आज पावेतो साधारणत: २१० शाखामधून शेतकरी, शिक्षक, ठेकेदार, निराधार, अपंग लोकांचे मानधन व अन्य ठेवीदार असे एकुण सुमारे १.८९ लाख खातेदारांना रु. ६०३ कोटीच्या ठेवी बँकेने उपलब्ध करून दिली आहे.आजपोवेतो जिल्हा परीषद, ठेकेदार, ग्राम पंचायत, पंचायत समिती, पोषण आहार इ. शासकीय व त्यांचे संलग्न तत्सम खात्यांतुन बँकेने बहुतांशी ठेवी परत केलेल्या असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नाशिक यांचे पत्र दि. २५.०७.२०१८ नुसार जिल्हा परीषद, पंचायत समिती व इतर तत्सम ८१ खाते मिळून सर्व निधी परत मिळाला असून, बँकेत खाते सुरू ठेवणेसाठीचा नाममात्र रु. ९ लाख निधी शिल्लक राहिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील ५५ अनुदानित वसतीगृहांना निधीचे वाटप न केल्याबाबत**

**(२९) १०३३८९ (०६-०१-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण खात्याअंतर्गत येणाऱ्या ५५ वसतीगृहांना गत वर्षीचा १ कोटी ८० हजार रु. व या वर्षीचा ७० हजार रु. चा निधी उपलब्ध असूनही चौकशीच्या नावाखाली तत्कालीन समाज कल्याण अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वितरीत केला नाही, हे खरे आहे काय,

(२)  तसेच शासन निर्णयानुसार तपासणी न करता ६०% अनुदान वितरीत करून नोव्हेंबर मध्ये तपासणी नंतर उर्वरित ४०% निधी वितरीत करणे बंधनकारक असूनही निधी न दिल्याने या दोन्ही अधिकाऱ्यांची चौकशी करावी व अहवाल पाठविण्याचे आदेश शासनाने काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाज कल्याण अधिकारी समाज कल्याण विभागात असल्याने त्यांच्या व एका कारकुनाची चौकशी त्यांच्या खात्याच्या आयुक्तामार्फत करण्यात आली पण संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी यांच्या चौकशीचे आदेश ग्रामविकास खात्यामार्फत असल्याने अजूनही त्यांची चौकशी झालेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१२-२०१८) :** (१) व (२) राज्यात काही अनुदानित वसतीगृहे शासनाची मान्यता नसतांनाही चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असल्याने अशा वसतीगृहाची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.त्यामुळे मान्यता आदेश नसलेल्या अनुदानित वसतीगृहांची तपासणी होईपर्यत त्यांचे अनुदान थांबविण्यात आले होते

तथापि यासंदर्भात प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) प्राथमिक चौकशीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेविरूध्द शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आलेली असून, अन्य कर्मचाऱ्यांविरूध्द तसेच अतिरिक्त मुख कार्यकारी अधिकारी यांचेविरूध्द कारवाई प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

(५) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व १९६१ मधील तरतुदीनुसार मजूर सहकारी पथसंस्थाचे सदस्य व पदाधिकारी मजूर बोगस असल्याबाबत**

**(३०) १०३६८४ (१३-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व १९६१ मधील तरतुदीनुसार मजूर सहकारी पतसंस्थोचे सदस्य व पदाधिकारी मजूर वर्गातील असणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे आयकर भरून दुसरीकडे मजूर संस्थाचे पदाधिकारी, सभासद मानून मिरवणारे बोगस मजूर आहेत काय तसेच अशा संस्थाची तपासणी केली काय,

(३) असल्यास, नियमानुसार कामे न करणाऱ्या संस्थाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

प्रत्यक्ष शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्ती तसेच, अल्प भूधारक व अत्याल्प भूधारक की जे उदरनिर्वाहाकरीता शारीरिक श्रमाची कामेही करतात, अशा व्यक्ती मजूर सहकारी संस्थाचे सभासद होण्यास पात्र आहेत.

(२) अशाप्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**शासनाच्या स्वाधार योजनेबाबत**

**(३१) १०४३६९ (१३-०७-२०१८). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाची स्वाधार योजना निराधार झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवबौध्द प्रर्वगातील विध्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश मिळाला नसल्याने विध्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे अनूदान दिले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांना अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कार्य आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) शासकीय वसतीगृहांत प्रवेश न मिळालेल्या वा पुढील शिक्षणासाठी निवास,भोजन वा अन्य सुविधा उपलब्ध होऊ न शकणाऱ्या अनुसूचित जाती व नबबौध्दा प्रावर्गातील विदयार्थ्यांना या सुविधा स्वता: उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाने दि. ०६.०१.२०१७ रोजी स्वाधार योजना सुरु केलेली असून, त्यासाठी या विदयार्थ्यांना शहराच्या वर्गवारीनुसार रु. ४३ हजार ते ६० हजार इतके अनुदान देण्यात येते.

सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये एकुण ४९३४ इतक्या विदयार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला असून, या योजनेचा लाभ जास्तीत-जास्त विदयार्थ्यांना व्हावा म्हणुन शासन निर्णय दि.०३.११.२०१८ अन्वये या योजनेत सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील औद्योगिक विकासात भर टाकणाऱ्या पांढरीपूल एमआयडीसीबाबत**

**(३२) १०७९०९ (१७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील औद्योगिक विकासात भर टाकणाऱ्या पांढरीपूल एमआयडीसीमध्ये स्थानिक तरुणांना प्राधान्य देण्यात यावे, जास्तीत जास्त मोठे उद्योग उभारावेत, बनावट रजिस्ट्रेशन केलेल्या जमिनी ताब्यात घ्याव्यात, अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे अखिल भारतीय शेतकरी मराठा महासंघाच्या वतीने लेखी निवेदनान्वये दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-११-२०१८) :** (१) व (२) अध्यक्ष, अखिल भारतीय शेतकरी मराठा महासंघ, महाराष्ट्र राज्य, यांनी मा.मंत्री (उद्योग), मंत्रालय, मुंबई यांना दिनांक ०९.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये निवेदन दिलेले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नेवासा तालुक्यातील शिंगवे-तुकाई, लोहगांव येथे २५४.४१ हे. आर क्षेत्रावर नेवासा औद्योगिक क्षेत्र विकसीत केले असून सदर संपादित क्षेत्रावर ३४४ भूखंडाचे आरेखण करण्यात आले. त्यापैकी १६८ भुखंड वाटप झाले असून १७६ भुखंड रिक्त आहेत. सदर औद्योगिक क्षेत्र ड प्रभागात असून या ठिकाणी ऑनलाईन सरळ पध्दतीने भुखंड वाटप करण्यात येते.

स्थानिक तरूणांना त्यांचे पात्रतेनुसार नोकरीमध्ये प्राधान्य देण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भुखंड धारकासोबत केलेल्या प्राथमिक करारनाम्यातील कलम ३ (o) (ii) नुसार तरतूद केली आहे. नेवासा औद्योगिक क्षेत्रामधील जमिनीच्या संदर्भात प्रश्नात नमूद केलेल्या कथित बनावट रजिस्ट्रेशन प्रकरणी महामंडळाकडे नेमकी तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात महामंडळाकडून चौकशी करण्यात येईल.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/ उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून राज्यातील सर्व औद्योगिक घटकामध्ये/उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबत, तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा अशा धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नव्याने स्थापित होणाऱ्या/विस्तारीकरण उद्योग घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रोत्साहने मंजूर करताना स्थालोरो-१ या विहित नमुन्यात दिनांक ३० जून पर्यंत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील अनियमिततेबाबत**

**(३३) १०८९३६ (१९-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील अनधिकृत प्रवासभत्ता व दैनिकभत्ता तसेच अनियमितता व मर्यादेपेक्षा जास्त अखेर शिल्लक बाळगण्याबाबत तक्रारीसंबंधी कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा उपनिबंधक, अमरावती यांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) होय.

(२) याबाबत चौकशी करण्यात आली आहे. माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, धामणगाव रेल्वे यांनी उचल केलेला प्रवासभत्ता व दैनिक भत्याची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्याबाबत दि.२६.४.२०१८ च्या आदेशान्वये निर्देश दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४०ई अन्वये मर्यादेपेक्षा जास्त अखेर शिल्लक कधीपासून व कोणत्या दिनांकापासून याबाबतचा हिशोब करून सदर रकमांवर व्याज आकारणी करून व्याजाच्या रकमेची वसूली सभापती,सचिव व लेखापाल यांचेकडून करून घेऊन बाजार समितीचे झालेले आर्थिक नुकसान भरपाई करण्याबाबत तसेच झालेल्या आर्थिक व्यवहारातील अनियमिततेबाबत संबंधीतांवर कार्यवाही करण्याबाबत दि.२६.४.२०१८ अन्वये निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली एमआयडिसीतील ११९ कारखान्यांकडे बांधकाम पूर्ततेचा दाखला (सीसी) नसल्याबाबत**

**(३४) १०९२५३ (२०-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली एमआयडीसीतील ११९ कारखान्यांकडे बांधकाम पूर्ततेचा दाखला (सीसी) नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीमध्ये माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बॉयलरचा स्फोट होवून १२ जणांना जीव गमवावा लागला तर अनेक रहिवाशांचे वैयक्तिक नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ पासून एमआयडीसीने अनेक कारखान्यांना सुरक्षेसंबंधीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीसी बजावल्या असून काही कारखान्यांनी बॉयलर खुल्या जागेत बांधले आहेत तर काही कारखान्यांनी बेकायदेशीररीत्या वाढीव बांधकाम केले असल्याने अग्निशमन विभागाकडून उक्त बांधकामास परवानगी दिलेली नाही नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बॉयलरच्या स्फोटानंतर राज्य सरकारने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना सदर प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचा आदेश दिला असून जिल्हाधिकाऱ्यांनी अद्यापही अहवाल सादर केला नाही, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुषंगाने उक्त कारखान्यांवर तसेच संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-१२-२०१८) :** (१) हे अशंतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

काही कारखान्यांनी सामासिक अंतरात तसेच मंजुरी व्यतीरिक्त बांधकाम केले असून अशा कारखान्यांना महामंडळामार्फत नोटीस बजावल्या आहेत. डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील कारखाने हे सन २००८ पुर्वीपासून आहेत. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ हा कायदा दिनांक ०६ डिसेंबर २००८ पासून लागू केला आहे. हा कायदा पुर्वीच्या बांधकामांना लागू करता येत नाही. त्यामुळे या कायदयाची अंमलबजावणी पुर्वीच्या बांधकामामध्ये करता आलेली नाही. तथापि, जे कारखाने बांधकामामध्ये बदल/ सुधारणा उत्पादनामध्ये बदल करताना किंवा नव्याने बांधकाम करतात अशा कारखान्यांचे प्रस्ताव ना-हरकत प्रमाणपत्रासाठी महामंडळाच्या अग्निशमन विभागाकडे येतात. त्यावेळी या कायदयाप्रमाणे सदर उद्योजकांना बांधकामाबाबत बदल करण्याचे मार्गदर्शन केले जाते व आगप्रतिबंध व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ या कायदयाची अंमलबजावणी करण्याबाबत सूचविले जाते. याबाबतची खातरजमा केल्यानंतरच सदर उद्योजकांना अग्निशमन अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले जाते.
(४) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, ठाणे यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालामध्ये MIDC Fire MPCB DISH स्थानिक प्राधिकारण, स्फोटक विभाग, पोलीस (गृह विभाग) इत्यादी संदर्भातील शिफारशीवर अभिप्राय सादर करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सदर अहवालातील शिफारशीचा अंतर्भाव राज्याच्या प्रस्तावित राज्याच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य व वातावरण या धोरणामध्ये करुन सुधारित धोरणाचा मसुदा शासनास सादर करण्याबाबत संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(५) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कल्याण यांचेकडून मे. प्रोबेस एंटरप्राईझेस या कारखान्याचे भोगवटदाराविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ अंतर्गत ४ फौजदारी खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी ठाणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. तसेच पोलीस विभागाकडून सदर घटनेच्या अनुषंगाने मानपाडा पोलीस ठाण्यात गु.रं.न. २७९/२०१६ अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३०४ (२), ३३७,३३८ व ४२७ प्रमाणे मालकाविरध्द गुन्हा नोंदविण्यात येऊन दिनांक २७/०७/२०१८ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानपाडा पोलीस स्टेशन यांनी सदर प्रकरणी अंतिम अहवालामध्ये ॲबेटेड समरी शेऱ्यासह प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सहायक पोलीस आयुक्त, यांचेकडे पाठविण्यात आले आहे.

---

## सोलापूर जिल्हयातील विविध कार्यकारी संस्थाना तोट्यातून बाहेर काढण्याबाबत

**(३५) ११००६७ (२०-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सुमारे १ हजार २८० विविध कार्यकारी संस्था असून त्यापैकी सुमारे ८०४ संस्था तोट्यात असल्याची माहिती जिल्हा उपनिबधंक, सोलापूर यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील सुमारे ८०४ संस्था तोट्यात असल्यामुळे त्यांनी या संस्थाचे उत्पन्न वाढीसाठी स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याचे निर्देश संबधित विभागाकडून त्यांना देण्यात आल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास सदर विविध कार्यकारी सोसायट्यांना नफ्यात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-११-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सोलापूर जिल्हयात एकूण १२७९ प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्था असून त्यापैकी सुमारे ८०४ विविध कार्यकारी सेवा संस्था तोट्यात आहेत. तालुक्यातील तोट्यात असलेल्या संस्थांचे उत्पन्न वाढीसाठी अटल महापणन अभियानांतर्गत जिल्हयातील एकूण १५० संस्थांची नवीन व्यवसायासाठी निवड केली आहे. त्यापैकी ४२ प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्थांनी नवीन व्यवसाय सुरू केलेले असून त्या सर्व संस्थांना त्यांच्या राखीव निधीतून व्यवसायासाठी लागणारे भांडवल रू. ७५,५४,११६/- रकमेस सहकार आयुक्त व निबंधक यांच्या स्तरावरून मंजूरी दिली असून तेवढ्या रकमेची संस्थेने व्यवसायात गुंतवणूक केलेली आहे. संबंधित संस्थांची रू.५६.७९ लाख इतकी उलाढाल होऊन रू. १९.३४ लाख एवढे उत्पन्न मिळाले व रू.८.०१ लाख एवढा नफा झालेला आहे. तोट्यातील अन्य संस्थांना अटल महापणन योजने अंतर्गत नवीन व्यवसाय सुरू करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सोलापूर यांच्याकडून निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### श्री.छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात पसरलेल्या दुर्गंधीमुळे आणि घाणीच्या सामाज्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(३६) ११०१२५ (१९-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात पसरलेल्या दुर्गंधीमुळे आणि घाणीचे साम्राज्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले असल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-१२-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संरक्षक भिंतीलगत झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीतील नागरीक तसेच याठिकाणची मोकाट जनावरे हे अस्वच्छता पसरवत आहेत. यावरील उपाययोजना म्हणून सदर ठिकाणी समितीच्या आरोग्य विभागामार्फत साफसफाई करण्यात येत असून, या ठिकाणी सुरक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. भविष्यात बाजार समितीच्या आवारात दुर्गंधी व घाणीच्या साम्राज्यामुळे नागरीकांची गैरसोय होऊन आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) या कार्यालयाकडून बाजार समितीला सूचना देण्यात आलेल्या आहेत. बाजार आवारात अस्वच्छता होणार नाही याची बाजार समिती प्रशासनाकडून दक्षता घेण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत स्थानिकांना नोकरीत सामावून घेत नसल्याबाबत

**(३७) ११०९९९ (२३-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत शासन निर्णय तसेच स्थानिक ग्रामपंचायतीचा ठराव असतानाही स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीत सामावून घेत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंडेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील मे.जिंदाल कंपनीत स्थानिक बेरोजगार तरुणांना नोकरीत सामावून घेण्याच्या मागणीसाठी स्थानिक बेरोजगार तरुणांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२७-११-२०१८) :** (१), (२) व (३) इगतपुरी, जिल्हा-नाशिक येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/ उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून राज्यातील सर्व औद्योगिक घटकामध्ये/उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबत, तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा अशा धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नव्याने स्थापित होणाऱ्या/विस्तारीकरण उद्योग घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विविध प्रोत्साहने मंजूर करताना स्थालोरो-१ या विहित नमुन्यात दिनांक ३० जून पर्यंत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**जिल्हा बँकेच्या निवडणुकीची रचना बदलण्याबाबत**

**(३८) १११०१५ (१८-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक रचना बदलल्या नंतर विकास सोसायटीचे कामकाज सुधारण्यासाठी जिल्हा बँकेच्या निवडणुकीची रचना बदल्याचे आदेश मा.सहकार मंत्री यांनी सचिव, सहकार विभाग यांना दिल्याची माहिती दिनांक २९ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा बँकेच्या निवडणुकीची रचना बदलण्याबाबत व शेतकऱ्यांना यामध्ये मतदानाचा अधिकार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-११-२०१८) :** (१) प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांच्या सभासद शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीत थेट मतदानाचा अधिकार देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी शासनास शिफारस करण्याकरिता दि.०२/२/२०१७ रोजीच्या शासननिर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली.

(२) समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालात नमूद केले आहे की, प्राथमिक कृषि पतपुरवठा करणाऱ्या सभासद शेतकऱ्यांना निवडणूकीत थेट मतदानाचा अधिकार दिल्यास बँकेच्या इतर सहकारी संस्थांच्या सर्वच सभासदांना मतदानाचा अधिकार द्यावा लागेल परिणामी बँकेच्या एकूण मतदारांची संख्या अंदाजे १० ते ११ लाखापर्यंत जाईल. यामुळे निवडणूक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होईल तसेच वेळोवेळी घ्याव्या लागणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी देखील तितकाच खर्च येईल. त्याचप्रमाणे एक शेतकरी एकाच वेळी अनेक संस्थांचा सभासद असू शकतो. जितक्या संस्थांचा सभासद तितके मतदानाचे मतदानाचे अधिकार वापरता येईल. एका व्यक्तीस एका संस्थेत एकापेक्षा अधिक मतदानाचा अधिकार दिल्यास मोठ्या प्रमाणात न्यायालयीन प्रकरणे दाखल होण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन शासनामार्फत निर्णय घेण्यात आला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील १५० गृहनिर्माण संस्था व सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरणाला प्रतिसाद देत नसल्याने बरखास्त करण्यात येणार असल्याबाबत

**(३९) १११५०५ (१८-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील १५० गृहनिर्माण संस्था व सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरणाला प्रतिसाद देत नसल्याने बरखास्त करण्यात येणार असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या संस्थाच्या संचालक मंडळाची मुदत संपली आहे अशा संस्थांना प्राधिकरणामार्फत निवडणूक घेण्यास मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सोलापूर शहरातील ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची मुदत संपली आहे अशा संस्थांच्या निवडणूका घेण्यास मुदतवाढ देण्यात आलेली नाही. तथापि निवडणूका घेण्यास टाळाटाळ करीत असलेल्या ११८ गृहनिर्माण सहकारी संस्थापैकी ३६ संस्थांच्या समित्या निष्प्रभावित करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३अ अन्वये

निवडणूक घेण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. तर उर्वरित ८२ गृहनिर्माण सहकारी संस्थांना कलम १०२ अन्वये अवसायानात का घेण्यात येवू नये अशा आशयाच्या नोटिसा देण्यात आलेल्या आहेत.
(३) लागू नाही.

---

**आंबा पीक कर्जावरील तीन महिन्यांच्या व्याजमाफीचे प्रस्ताव बँकेने मंजूर करुनही बहुतांश बागायतदार त्यापासून वंचित असल्याबाबत**

**(४०) ११३६५३ (२३-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोन वर्षापुर्वी मंजूर केलेल्या आंबा पीक कर्जावरील तीन महिन्यांच्या व्याजमाफीचे प्रस्ताव बँकेने मंजूर करुनही बहुतांश बागायतदार त्यापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी व्याजमाफीच्या प्रस्तावाच्या बागायतदारांची यादी तयार करुन संबंधिताकडे पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणात संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच बागायतदार यांना व्याजमाफी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालूक्यातील निफाड साखर कारखान्याच्या यंत्र सामुग्रीसह स्थावर मालमत्तेची जप्ती करण्यात आल्याबाबत**

**(४१) ११५३०१ (१९-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालूक्यातील निफाड साखर कारखान्याच्या यंत्र सामुग्रीसह स्थावर मालमत्तेची जप्ती करण्यात आली असताना उक्त कारखाना चालविण्यासाठी दोनदा निविदा काढण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त साखर कारखाना भाडे तत्वावर चालविण्यास कोणतीही सहकारी संस्था इच्छूक नसल्याने सदर कारखान्याच्या जागेवर ड्रायपोर्ट प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा बँकेच्या थकित कर्जाची वसूली करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) होय.

कारखान्याची मालमत्ता सरफेशी कायद्यांतर्गत नाशिक जिल्हा बँकेने जप्त केलेली असून जिल्हा बँकेने दिनांक २८.८.२०१७ रोजी कारखाना विक्री व भाडेतत्वावर देणे बाबत निविदा मागविल्या होत्या.
(२) सदरची बाब ही केंद्र शासनाशी संबंधीत असून त्याबाबतची माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यामध्ये राज्य शासनाने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान कर्जमाफी योजनेची घोषणा होऊनही पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नसल्याबाबत**

**(४२) ११६७४० (०२-०८-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने जाहिर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान कर्जमाफी योजनेच्या घोषणेला ९ महिने होऊनही सोलापूर जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नसतांना सुमारे ३५ हजार शेतकऱ्यांची नावे यादीत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील ३५ हजार शेतकऱ्यांच्या यादीत त्रूटी आढळल्याने त्या दुरुस्तीसाठी जिल्हा बँकेने सदर यादी शासनाकडे परत पाठविली असता, सदर यादी पुन्हा पोर्टलवर न दिल्यामुळे जिल्ह्यातील ३५ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्जदारांसाठी एकरकमी परतफेड कर्ज योजना, अर्थात ओटीएस योजनेची घोषणा केली असता, सोलापूर जिल्ह्यातील १६००० शेतकरी पात्र ठरले असता, ज्या शेतकऱ्यांनी वेळेत पैसे भरले अशा ६०० शेतकऱ्यांचे १२ कोटी रुपये प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अद्यापही सोलापूर जिल्ह्यातील कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत तसेच ओटीएस योजनेतील ६०० शेतकऱ्यांचे १२ कोटी रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) व (२) नाही.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ३०,४९२ खातेदारांच्या माहितीमध्ये काही त्रुटी असल्यामुळे बँकेने सद्याची माहिती दुरुस्त करुन पोर्टलवर फेर अपलोड केली आहे. त्यापैकी १३,७६६ खातेदारांची नावे विविध ग्रीन लिस्ट मध्ये आली असून उर्वरीत खातेदारांची छाननी करण्यात येत आहे.
(३) नाही,
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ घेतलेले हजारो उद्योग बंद पडल्याबाबत

**(४३) ११७४७० (०२-०८-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामूहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ घेतलेले हजारो उद्योग बंद पडल्याने शासनाला मोठा तोटा सहन करावा लागत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वर्षानुवर्षे बंद असलेले उद्योग शासनाकडे हस्तांतरित करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-११-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) राज्यात उद्योगांची वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून शासन सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबवित आहे. राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण २०१३ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ कार्यान्वित करण्यात आली असून, तीचा कालावधी १ एप्रिल, २०१३ ते ३० सप्टेंबर, २०१८ किंवा नवीन औद्योगिक धोरण अंमलात येईपर्यंत असा आहे.

सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या कार्यनियमावली नुसार पात्र घटकांचा कार्यकालावधी दिनांक २१ मे, २००८ च्या निर्णयान्वये पुनर्निश्चित करण्यात आला आहे. पूर्वीच्या नियमानुसार सदर कालावधी हा घटकाच्या उत्पादनाच्या दिनांकापासून २० वर्षे इतका होता. त्यामध्ये बदल करुन हा कालावधी प्रोत्साहनांच्या अंतिम दिनांकापासून सुक्ष्म व लघु घटकांकरीता ५ वर्षे, मध्यम व मोठया घटकांकरीता ७ वर्षे व विशाल प्रकल्पांकरीता १० वर्षे केला आहे. तसेच शासनाने जाहीर केलेले इलेक्ट्रॉनिक्स धोरण दिनांक ११ एप्रिल, २०१६ व अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण दिनांक १४ फेब्रूवारी, २०१८ या योजनेतील घटकांना कार्यकालावधी असणार नाही असे जाहीर केले. जेणेकरुन सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत लाभ घेतलेला घटक साप्रोयोच्या कार्यकालावधीमधून लवकरात लवकर बाहेर पडू शकेल.

साप्रोयो अंतर्गत लाभ घेतलेले बंद पडलेले उद्योग ३३५८ असून, त्यांची अचल भांडवली मालमत्ता रु.४२५९८७.२५ लक्ष होती. त्यात एकूण ६३,११० कामगार कार्यरत होते. सदर उद्योग घटकांकडून परतफेड करावयाची मुद्दल रु.१६१६९४.६९ लक्ष व त्यावरील व्याज रु.१८७२०.२८ लक्ष होते. त्यापैकी ३३४ उद्योग घटकांकडून मुद्दल रु.४४७४.८६ लक्ष व व्याज रु.१७५.७२ लक्ष शासनाने वसूल केले.

सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या (साप्रोयो) अंतर्गत लाभ, नियमावलीमध्ये घेतलेला उद्योग बंद पडल्यास खालील पध्दतीने घटक दायित्वाची परतफेड करुन हस्तांतरण/ पुर्नस्थापित होऊ शकतो.

१) बंद पडलेल्या उद्योगाकडून उद्योग बंद असलेला कालावधी व एकूण प्रोत्साहनाचा कालावधी याच्या प्रमाणात प्रोत्साहन परत करता येते किंवा .

२) बंद पडलेला उद्योग घटक एखादा नवीन उद्योजक घटक घेऊन उत्पादन सुरु करीत असेल व अगोदरच्या उद्योगाचे साप्रोयो अंतर्गत दायित्व स्विकारण्यास तयार असेल तर अशा बंद उद्योगाच्या हस्तांतरणास परवानगी देण्यात येते.

या व्यतिरिक्त राज्यातील आजारी व बंद उदयोग घटकांसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.

आजारी मोठया उद्योगांचे पुनर्वसन करण्यासाठी आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष तरतूदी) अधिनियम, १९९५ च्या तरतूदीनुसार केंद्र शासनाने औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ (बीआयएफआर) ची स्थापना केली आहे. तोटयात गेलेल्या घटकांनी या मंडळाकडे संपर्क साधल्यास, त्याच्या अर्जाच्या छाननी नुसार, त्याला आजारी उद्योग घोषित करुन पुनर्वसन योजना तयार करण्यासाठी प्रतिनिधीक संस्थेची नेमणूक करण्यात येते.

शासनाने मोठया उद्योगांसाठी शासन निर्णय क्रमांक :- एसआयसी-२००७/(१/७)/ उद्योग-१०, दिनांक ३० मार्च, २००७ अन्वये खालील उपाययोजना केल्या आहेत.

(१) आजारी उद्योगांना तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत आयुक्त (सहकार) यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या उद्योगांना सुश्रूषा कार्यक्रम अंमलात येण्याच्या दिनांकादिवशी थकीत असलेली राज्य शासनाची सर्व देणी सवलतीच्या दराने (द.सा.द.शे. ७%) ६० मासिक हप्त्यामध्ये भरण्याची सवलत.

(२) घटकास अखंडित व सुरळीत वीजपुरवठा.

(३) बॉम्बे रिलिफ अंडरटेकींग अधिनियम, १९५८ (बीआरयू) अंतर्गत सहायक उपक्रम म्हणून घोषित करणे.

(४) कामगारांशी चर्चा करताना आजारी उद्योगाला शासकीय यंत्रणेमार्फत सहाय्य.

(५) जिल्हा स्तरावर सुक्ष्म, लघू व मध्यम आजारी उद्योगांसाठी समिती गठीत करण्यात आली असून, या समितीमार्फत आजारी उद्योगांचे वित्तीय संस्थांच्या समन्वयाने पुनर्वसन करण्यात येते.

अशा रितीने शासनाने आजारी व बंद पडलेल्या उद्योग घटकांकरीता तसेच हस्तांतरणासंदर्भात वेळोवेळी वरील प्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

(४) लागू नाही.

---

## मुंबईतील लालबाग येथील डॉ.आंबेडकर रोडवरील जामा बिल्डींग-१ मधील जुन्या दुकानदारांना न्याय मिळण्याबाबत

**(४४) ११७५८० (०२-०८-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लालबाग येथील डॉ.आंबेडकर रोडवरील जामा बिल्डींग-१ मधील सुमारे ७० ते ८० वर्ष जुन्या असलेल्या दुकानदारांना अनधिकृत ठरवून दुकाने खाली करण्यासाठी राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने (एनटीसी) माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पब्लिक प्रिमायसेस ॲक्ट जबरदस्तीने लावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुकानदारांनी दरमहा भाडे अधिक सेवाकर आणि सन २०१२ पासूनची थकबाकी भरुनही त्यांना दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत दुकाने खाली करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यासुमारास एनटीसीच्या विरोधात दुकानदारांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गत ७० ते ८० वर्षापासून जुन्या दुकानदारांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दुकानदारांनी भाडे व लागू असलेले कर देण्यास नकार दिला त्यामुळे संपदा अधिकारी (Estate Officer) यांनी आवश्यक सूचना देवून लोक परिसर अधिनियम (Public Premises Act) १९७१ अंतर्गत सुनावण्या घेवून आदेश पारित केले. सदर सुनावण्यांमध्ये दुकानदारांनी व त्यांच्या वकिलांनी भाग घेतला.

(२) सदर दुकानदारांनी त्यांच्या दुकानाचे दि.१.९.२०१२ ते दि.३१.३.२०१८ ह्या कालावधीचे भाडे अधिक सेवाकर अधिम थकबाकी एन.टी.सी.कडे भरली सर्वोच्च न्यायालयाच्या दि.७.७.२०१७ च्या आदेशानुसार जामा मिल मधील दुकानदारांना त्यांच्या दुकानाचा ताबा एन.टी.सी.ला दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत देण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार एन.टी.सी.ने सदर दुकानदारांना दुकाने खाली करण्याच्या नोटीसा दिल्या.

(३) संबंधित दुकानदार किंवा त्यांच्याशी संबंधित कोणत्याही संस्थेने एन.टी.सी.च्या विरोधात कोणत्याही प्रकारचे आदोलन कोठेही करणार असल्याची सूचना एन.टी.सी.ला दिलेली नव्हती. तथापि सदर दुकानदारांनी एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवडयामध्ये दुकानासमोर आपला विरोध प्रकट केला.

(४) व (५) जामा मिल ही राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एन.टी.सी.) अधिनस्त असून सदर महामंडळ हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी ही केंद्र शासनाच्या अधिकारातील बाब आहे.

---

## नाशिक जिल्ह्यातील चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा लिलाव बेमुदत बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(४५) ११९०४३ (२५-०७-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा लिलाव बेमुदत बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांना बाजार समितीमधून पुन्हा कांदा घरी न्यावा लागल्याने डिझेलचा नाहक भुर्दंड त्यांच्यावर बसला असल्याने शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासनाकडे लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-१२-२०१८) :** (१) होय.

चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परवानाधारक खरेदीदार व्यापारी वर्गाच्या असहकारामुळे व आडमुठे धोरणामुळे लिलाव प्रक्रीयेत अडथळा निर्माण झाल्याने, बाजार समिती प्रशासनाने दि.४.४.२०१८ पासून कांदा शेतीमालाचे लिलाव पुढील निर्णय होईपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा तसेच पिक कर्जाचा लाभ मिळण्याबाबत**

**(४६) ११९७५५ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील १,३८,४७४ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा तसेच पिक कर्जाचाही लाभ मिळाला नसल्याने खाजगी सावकारांकडे कर्जाकरिता जावे लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या शेतकऱ्यांना पिक कर्जाचा लाभ तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-१२-२०१८) :** (१) व (२) नाही.

अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात कर्जमाफीची प्रक्रीया सुरू असून व्यापारी, ग्रामीण व जि.म.स बँकांनी मिळून १.५२ लाख खातेदारांकडील ८२४.५८ कोटी एवढी रक्कम माफ करण्यात आलेली आहे, तसेच ३०१६ खातेदारांना एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत रु. १९.१६ कोटीचा लाभ देण्यात आला व ४६५८ खातेदार रु. ८.०४ कोटी रकमेच्या प्रोत्साहनपर लाभास पात्र ठरले. अशा प्रकारे जिल्ह्यातील एकुण १.६० लाख खातेदारांना रु. ८५१.७९ कोटीचा लाभ देण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर व मंगळवेढ़ा (जि.सोलापुर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अर्ज द्या व कर्ज घ्या या योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) १२२५६२ (०२-०८-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर व मंगळवेढ़ा (जि. सोलापुर) तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने 'अर्ज दया व कर्ज घ्या' या योजनेतून अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँकानी सुमारे २ वर्षापासून कर्ज उपलब्ध करुन दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेमध्ये मंगळवेढ़ा तालुक्यातील एकुण सुमारे ८२० शेतकऱ्यांनी अर्ज केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतंर्गत किती शेतकऱ्यांना कर्ज देण्यात आले आहेत वा देण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, सदर योजनेतंर्गत शेतकऱ्यांना तातडीने कर्ज योजना लागू होण्याकरीता शासनाने राष्ट्रीयकृत बँकांना सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१८) :** (१) नाही

पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यामध्ये अर्ज द्या कर्ज घ्या या सुलभ पीक कर्ज अभियानांतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर कार्यालयाने सन २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधीत एकूण ४६ ठिकाणी पीक कर्ज मेळावे घेतले असुन रु. ५७.८० कोटी चे कर्ज वाटप करण्यात आले.

(२) होय.

(३) मंगळवेढा तालुक्यातील एकुण ११ राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखांनी सन २०१६-१७ सालामध्ये एकुण १३४९ शेतकऱ्यांचे पीक कर्ज नुतनीकरण करून त्यांना एकुण रक्कम रु. १९.०८ कोटी व एकुण ५३७ शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज रक्कम रु. १०.७३ कोटी एवढे वाटप केलेले आहे. तसेच सन २०१७-१८ साली मंगळवेढा तालुक्यामध्ये एकुण ९ ठिकाणी पीक कर्ज मेळावे घेण्यात आलेले होते. सदर पीक कर्ज मेळाव्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शेतकऱ्यांनी पीक कर्ज मागणी अर्ज बँकेस सादर केले होते. मंगळवेढा तालुक्यातील एकुण ११ राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखांनी सन २०१७-१८ सालामध्ये एकुण १०५० शेतकऱ्यांचे पीक कर्ज नुतनीकरण करून त्यांना एकुण रक्कम रु. १५.१५ कोटी व एकुण ४२२ शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज रक्कम रु. ७.५५ कोटी एवढे वाटप केलेले आहे. पंढरपूर तालुक्यात २९ मेळावे घेवुन ४८१ शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांनी रु. ५.२९ कोटी कर्ज वाटप केले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्ड आवारात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत**

**(४८) १२३३६६ (२५-०७-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्ड आवारात सुरक्षेसाठी लावलेले ९४ सीसीटीव्ही कॅमेरे गत दोन वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास सीसीटीव्ही दुरूस्तीची परवानगी निविदा प्रक्रियेमध्ये अडकली असल्याने मार्केट यार्डच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मार्केट यार्ड आवारात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) होय.

(२) एकूण २४८ कॅमेऱ्यांपैकी १४५ कॅमेरे चालू असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(३) बंद असलेल्या १०३ कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यात कडधान्य व तृणधान्य साठवणूकीसाठी गोदामे निर्माण करण्याबाबत**

**(४९) १२५४५६ (२७-११-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हमी भावाने खरेदी करण्यात आलेले कडधान्य व तृणधान्य साठवणूकीसाठी विविध ठिकाणी गोदामे निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गोदामे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-१२-२०१८) :** (१) व (२) राज्यात हमी भावाने खरेदी करण्यात आलेले कडधान्य व तृणधान्य साठवणूकीसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत २० ठिकाणी एकूण ६४१९० मे.टन साठवणूक क्षमता निर्माण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य, वखार महामंडळाने हाती घेतले आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**कुकाणा (ता.नेवसा, जि.अहमदनगर) येथील नारायणगिरी पतसंस्थेची मान्यता रद्द करणेबाबत**

**(५०) १२५७५३ (२८-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकाणा (ता.नेवसा, जि.अहमदनगर) येथील नारायणगिरी पतसंस्थेने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा न करता त्यांच्या मालमत्तेची कागदपत्रे पतसंस्थेच्या नावे केल्याने नैराश्यात सापडलेल्या शेतकऱ्यांनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नारायणगिरी पतसंस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सदर कर्ज प्रकरणात झालेल्या अनियमिततेबाबत पतसंस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन, नेवासा येथे दिनांक १६.६.२०१८ रोजी गुन्हा क्र. ३४३/२०१८ दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.